धार्मिक देवस्थानच्या अनधिकृत
बांधकामास आळा घालण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग (विशेष)
परिपत्रक क्र.सीटीएम २०००/प्र.क्र.२४/विशा-१ब,
मंत्रालय,मुंबई ४०००३२,दिनांक ७ जून २०००

वाचा:- महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्रमांक.एनएपी १०८५/१०५७८३ (९११)-ले-२,

दिनांक १४ ऑक्टोबर,१९८५.

## परिपत्रक

शासनाच्या जमिनीवर, खाजगी जागेत, सार्वजनिक ठिकाणी तसेच शासकीय कार्यालयाच्या आवारात संबंधित प्राधिकरणाची पूर्व परवानगी न घेता काही लोक किंवा संघटनांनी मंदिरे,मशीद,चर्च इ. धार्मिक देवस्थानची प्रतिष्ठापना केल्याचे निदर्शनास आलेले आहे. धार्मिक स्थळाच्या अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने पुढील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

अ) समाजकंटकाद्वारे धार्मिक देवस्थानाची विटंबना झाल्यास कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होते.

आ) काही वेळा धार्मिक देवस्थानाच्या जागेवरुन प्रतिष्ठापनेवरुन मतभेद निर्माण होतात अशा वेळी परस्पर विरोधी मागण्या,निवेदने व प्रसंगी आंदोलने केली जातात.

इ) भविष्यात वाहतूकीचा ताण कमी करण्याच्या दृष्टिने रस्त्याचे रुंदीकरण करावयाचे झाल्यास अथवा उड्डाणपूल/भुयारी मार्ग बांधावयाचे झाल्यास, शासकीय जमिनीवरील किंवा खाजगी जागेत अतिक्रमण दूर करावयाचे असल्यास, त्या ठिकाणी असलेले धार्मिक देवस्थान स्थलांतरीत करणे आवश्यक ठरते. अशा वेळी काही गटाच्या भावना दुखावल्या जाण्याचा संभव असतो व त्यामुळे आंदोलने,रस्ता रोको,रेल रोको इ.माध्यमांचा वापर केला जातो.

ई) सद्यस्थितीत काही शासकीय जमिनीवर किंवा रस्त्यावरील, चौकातील अथवा खाजगी जागेतील धार्मिक देवस्थानांमुळे जरी समस्या उद्‌भवत नसली तरी भविष्यात शासकीय कार्यालयांचा विस्तार,विकासांतर्गत योजना,प्रकल्प इ. तसेच वाहतुकीची प्रचंड प्रमाणातील संभाव्य वाढ लक्षात घेता निश्चितच समस्या निर्माण होवू शकते.

उ) धार्मिक देवस्थाने बांधल्यावर त्याच्या संरक्षणाची,मांगल्य टिकवून ठेवण्याची जबाबदारी संबंधितांकडून घेतली जात नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
19 JUN 2000
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

२. वरील बाबींचा विचार करुन असे निदेश देण्यात येत आहेत की,

अ) शासकीय,खाजगी जमिनीवर मंदिर,मशिद,चर्च इ. चे बांधकाम करण्यास परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावेत.

आ) सदर प्रस्ताव सादर करण्यापूर्वी अर्जदारानी ग्रामपचायत नगरपालिका व महानगरपालिका यांची परवानगी घेतली आहे किंवा नाही हे तपासण्यात यावे. व ग्रामपंचायत/नगरपालिका, महानगरपालिका,सार्वजनिक बांधकाम विभाग यांची परवानगी असलेले प्रस्तावच शासनास पाठवावे.

इ) सदर प्रस्तावाबाबत संबंधित पोलीस अधिका-यांचे कायदा व सुव्यवस्थेबाबत तसेच रहदारीस अडथळा याबाबतचे अभिप्राय प्रस्तावासोबत असणे आवश्यक आहे.

ई) धार्मिक स्थळांचे वाढीव बांधकाम करणे किंवा पुर्नबांधकाम करणे याबाबत सुध्दा वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. कोणत्याही परिस्थितीत शासकीय जमिनीवर, शासकीय कार्यालयाच्या आवारात खाजगी जागेत रस्त्याच्या बाजूला, चौकात ,सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या क्षेत्रात धार्मिक देवस्थानाचे बांधकाम शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय करण्यात येवू नये.

४. अशा प्रकारची धार्मिक स्थळांची अनधिकृत बांधकामे, निदर्शनास आल्यास त्यावर तात्काळ कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्वाक्षरी) ८.६.२०००

(अ. द.काळे )

उप सचिव,महाराष्ट्र शासन,गृह विभाग (विशेष)

प्रति,
प्रधान सचिव (नगर विकास विभाग),
प्रधान सचिव (महसूल व वन विभाग)
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस अधिक्षक.

क्र. डीसी-१/पोष/३९७/२०००
जिल्हादंडाधिकारी कार्यालय
रत्नागिरी दि. -६-२०००

~~प्रत- १) उपविभागीय~~
प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
(1) उपविभागीय अधिकारी (सर्व)